# " ऋणनिर्देश "

दे. भ. तुळशीदास जाधव यांचे राजकीय नेतृत्व या विषयावर शोध-निबंध लिहित असताना मला फार आनंद वाटत आहे. कारण सर्व सामान्य कुटुंबातील व्यक्ती महाराष्ट्रातील व तसेच देशातील महत्वाच्या पदाची जबाबदारी आपल्या कौशल्याने यशस्वी पार पाडते व त्या व्यक्तीच्या कार्याची माहिती जनतेला करून देणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

मला माझा शोध-निबंध पूर्ण करण्यासाठी माझे मार्गदर्शक प्राध्यापक के.के. कावळेकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे फार मोठे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी मला वेळोवेळी मार्गदर्शन करून शोध-निबंध पूर्ण करण्यास प्रोत्साहन दिले. मला त्यांचे ऋण फेडण्यासाठी माझ्याजवळ शब्दच नाहीत. त्यांनी माझ्यावर केलेल्या प्रेमाची या जन्मी परतफेड होणे अशक्य आहे. मला दिलेल्या सतत प्रेरणेने मी हा माझा शोध-निबंध पूर्ण करू शकलो. तेव्हा त्यांचे आभार मानने मी माझे आद्य कर्तव्य समजतो. तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एल्. आर. तारोडी, डॉ. वासंती रासम, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. मेघा नानिवडेकर व प्रा. भारती पाटील यांचेही मला वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्यांचेही मी आभार मानतो.

तसेच माझा शोध-निबंध लिहिण्यासाठी श्री. संभाजी तोरस्कर यांचे मौलिक सहकार्य लाभले. राज्यशास्त्र विभागाचे क्लार्क शिवाजी ढवाण व अरूण वणीरे यांचेही सहकार्य लाभले यांचाही मी आभारी आहे.

माझा शोध-निबंध पूर्ण करण्यासाठी श्री. गोविंदराव पंके, दे.भ. तुळशीदास जाधव यांचे चिरंजिव श्री. यशवंत (बाळासाहेब) जाधव व त्यांच्या घरातील सर्वांनी मला दादा विषयी जी माहिती पुस्तकाच्या रूपाने देऊन मला मोठे सहकार्य केले. तसेच श्री. ह ना काटे यांनीही मला वेळोवेळी मदत केली. तसेच माझे सर्व सहकारी मित्रानी मला माझा शोध-निबंध लिहिण्यास प्रोत्साहन दिले या सर्वांचा मी आभारी आहे.

मी माझा शोध-निबंध हा आजी आजोबांच्या आशिर्वादाने व आई-वडिलांच्या प्रेरणेने व घरातील सर्वांच्या सहकार्याने पूर्ण करू शकलो . मी या सर्वांच्या उपकाराची परतफेड न करता त्यांच्या ऋणात रहाणे मी माझे कर्तव्य समजतो.

- दिपक पंढरीनाथ मोरे